# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- नागपूर शहरात १) लक्ष्मीभवन चौक २) महाराजबाग रोड,
**{आकाशचिन्ह परवाना विभाग}** शंकर भोजनालया समोर, सिताबर्डी असे दोन गॅन्ट्रीवर आकाशचिन्हे प्रदर्शित करण्याचे अधिकार देण्यासंबंधात प्राप्त झालेल्या मे M/s. Vidarbha Infotech Pvt. Ltd. यांची रु. २७,६१,००५/- ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

संक्षिप्त टिपणीः-

१. सादर करण्यात येते की, नागपूर शहरात १) लक्ष्मीभवन चौक २) महाराजबाग रोड, शंकर भोजनालया समोर, सिताबर्डी असे दोन गॅन्ट्रीवर आकाशचिन्हे प्रदर्शित करण्याचे अधिकार देण्यासंबंधात खालील प्रमाणे निविदा बोलविण्यात आल्या.

| अ.क्र. | निविदा क्र. / Tender ID | निविदेची वेळ | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|---|
| **१** | क्र. २९३/PR, दिनांक १३.१०.२०२२ तथा e-Tender ID, २०२२_NMCN_ ८४३९४७_०१ | प्रथम (First Call) | निरंक |
| **२** | क्र. ३७०/पी.आर, दि. १४.१४.२०२२ तथा २०२२_NMCN_८५१५९६_१ | दुसरा (२nd Call) | एक |

२. वरील प्रामणे पहिल्यांदा निविदा बोलविण्यात आल्यानंतर काही प्रतीसाद मिळत नसल्यामुळे दुस-यांदा (२nd Call) बोलविण्यात आलेल्या निविदे मध्ये एकमात्र निविदाकार M/s. Vidarbha Infotech Pvt. Ltd. यांची आधाभुत किंमत (Offset Price) रु. २७,५१,००५/- च्या तुलनेत जास्ती म्हणजे रु. २७,६१,००५/- ची निविदा प्राप्त झालेली आहे.

३. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दिनांक २७.०९.२०१८ मधील पृष्ठ क्र. १६ अनुक्रमांक ४.३ चे कृपया अवलोकण व्हावे. उक्त शासन निर्ययामध्ये मुळ प्रारूप निविदेमध्ये कुठलाही बदल न केल्यास नवीन केलेली मागणी ही व्दितीय मागणी समजण्यात येईल. अशा मागणीनंतर जर परत एकाकी निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदाबाबत निविदा उघडुन प्रचलित कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही करावी. अशा निविदेबाबत पुन:श्च फेरनिविदा मागविण्याची आवश्यकता नाही असे नमुद आहे.

४. करीता नागपूर महानगरपालिकेचे आर्थिक हित लक्षात घेता M/s. Vidarbha Infotech Pvt. Ltd. यांची रु. २७,६१,००५/- ची निविदेस मंजूरी प्रदान करण्यास विभागाची शिफारस आहे.
सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 221/**मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 28/12/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त

झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), आकाशचिन्ह परवाना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार  नागपूर शहरात १) लक्ष्मीभवन चौक २) महाराजबाग रोड, शंकर भोजनालया समोर, सिताबर्डी असे दोन गॅन्ट्रीवर आकाशचिन्हे प्रदर्शित करण्याचे अधिकार देण्यासंबंधात प्राप्त झालेल्या मे M/s. Vidarbha Infotech Pvt. Ltd. यांची रु. २७,६१,००५/-  ची निविदा मंजूर  करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**